सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# जिल्हाधिकारी कार्यालय,पुणे ,(आपत्ती व्यवस्थापन शाखा)

दुरध्वनी क्र.020-26123371 E-Mail- homebranchpune@gmail.com

वाचा :-१) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005
२) महाराष्ट्र पोलीस अधिनियम 1951
३) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम 1897
४) मा.मुख्यमंत्री ,महाराष्ट्र राज्य यांचे दि.13/03/2020 रोजीचे निर्देश

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,
जिल्हाधिकारी कार्यालय पुणे,
क्र.कक्ष/कोरोना विषाणू/ ४०७/2020.
पुणे, दिनांक :- १४ /03/2020.

जिल्हाधिकारी पुणे

विषय :- कोरोना या विषाणूचा संसर्ग व प्रादूर्भाव रोखणे करीता
विविध गर्दीच्या कार्यक्रमांवर बंदी घालणे बाबत...

## आदेश

ज्याअर्थी आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 मधील कलम 25 अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे व त्यातील पोट कलम 2 (अ )नुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी हे उक्त प्राधिकरणाचे पदसिद्ध अध्यक्ष आहेत.

आणि ज्याअर्थी ,आंतरराष्ट्रीय स्तरावर व देशांतर्गत कोरोना या विषाणूचे संसर्ग बाधीत रुग्ण आढळत आहेत तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरुन व देशांतर्गत विमान प्रवासाव्दारे प्रवासी भारतात सर्वत्र प्रवास करीत आहेत .असे प्रवासी पुणे जिल्हयामध्येही परदेश प्रवास करुन आलेले आहेत व बरेच प्रवासी परतण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे कोरोना या विषाणूचा संसर्ग व प्रादूर्भाव पसरण्याची शक्यता लक्षात घेता त्यावर तत्काळ नियंत्रण करणे व कोरोना विषाणूचे संसर्ग असल्यास त्यात अधिक वाढ होऊ न देता त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना आखणे आवश्यक आहे. अशा प्रवाशांमुळे कोरोना विषाणूचा संसर्ग जिल्हयात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यास्तव गर्दीच्या ठिकाणी जाणे, वास्तव्य करणे, इत्यादी बाबी टाळणे अत्यावश्यक आहे.

उपरोक्त प्रमाणे कोरोना विषाणूच्या प्रसाराचे माध्यम पहाता, सदर विषाणूची लागण एका संक्रमीत रुग्णाकडून अन्य व्यक्तीस/इसमास त्याच्या संपर्कात आलेने होण्याची शक्यता विचारात घेता, **मी नवल किशोर राम ,अध्यक्ष , जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण तथा जिल्हादंडाधिकारी पुणे ,जिल्ह्यात आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५तसेच महाराष्ट्र पोलीस कायदा १९५१ अन्वये मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन या आदेशाव्दारे मोठया प्रमाणात लोकांचा समुह एकत्र जमू न देण्यासाठी, संपूर्ण पुणे जिल्हयामध्ये घेणेत येणा-या सभा, मेळावे, सामाजिक कार्यक्रम, जत्रा, यात्रा, उरुस, धार्मिक व सांस्कृतीक कार्यक्रम, क्रिडास्पर्धा, जलतरण तलाव, सर्व जिम, प्रेक्षागार,नाटयगृहे, सिनेमागृहे इत्यादीवर आज दिनांक १४ मार्च २०२० ते दिनांक ३१ मार्च २०२० पर्यंत बंदी लागू करीत आहे.**

सर्व शासकीय यंत्रणांना ही निर्देशीत करीत आहे की, अशाप्रकारे सभा, मेळावे, सामाजिक कार्यक्रम, जत्रा, यात्रा, उरुस, धार्मिक व सांस्कृतीक कार्यक्रम, क्रिडास्पर्धा आयोजना संदर्भात कोणतीही परवानगी त्यांच्या स्तरावर देण्यात येऊ नये. **तसेच पुणे व पिंपरी चिंचवड येथील जलतरण तलाव, सर्व जिम, प्रेक्षागृह,नाटयगृहे, सिनेमागृहे, खाजगी कोचिंग क्लासेस इत्यादी पुढील आदेश होईपर्यत बंद ठेवण्यात यावेत.**

या आदेशाचे उल्लंघन केल्यास भारतीय दंड सहिता कलम १८८ व आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ याव्दारे कारवाई करणेत येईल.

जिल्हाधिकारी पुणे

(नवल किशोर राम)
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,**
**जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे**

प्रति,

1. **मा. विभागीय आयुक्त पुणे विभाग पुणे**
2. **आयुक्त पुणे महानगरपालिका व पिंपरी चिंचवड महानगरपालिका**
3. **पोलीस आयुक्त, पुणे शहर व पिंपरी चिंचवड .**
4. **पोलीस अधिक्षक पुणे ग्रामीण**
5. **मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पुणे,**